26 DEC 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. जयसिंगराव पवार : डॉ. आय. एच. पठाण लिखित छत्रपती शिवाजी महाराज ग्रंथ प्रकाशन

# छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदूचे नव्हे, तर भूमिपुत्रांचे राजे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हिंदूचा राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना संकुचित करणे चुकीचे आहे. ते केवळ हिंदूंचे नव्हे तर भूमिपुत्रांचे राजे होते, त्यांच्यामुळेच देशात पहिल्यांदाच भूमिपुत्राचे अर्थात हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. जे पूर्णता सेक्युलर होते आणि पुढे कायमच लोकशाही देशाला प्रेरणास्थान राहिले, अशी मांडणी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी शनिवारी येथे केली.



डॉ. आय.एच.पठाण लिखित छत्रपती शिवाजी महाराज या ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी शाहू स्मारकमध्ये डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते व कुलगुरु डॉ.टी.शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी बाळासाहेब कुपेकर, शिवाजीराव चव्हाण, श्रीपतराव शिंदे, प्राचार्य टी.एस पाटील, प्राचार्य विलास पोवार, एम.बी.शेख उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीतर्फे प्राचार्य डॉ. आय.एच.पठाण लिखित छत्रपती शिवाजी महाराज या ग्रंथाचे प्रकाशन शाहूस्मारक भवनमध्ये झाले. यावेळी डॉ. पवार बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले, हे पुस्तक केवळ चरित्र नव्हे तर संदर्भ ग्रंथ आहे. शिवाजी महाराजांच्या पूर्वीची आणि नंतरच्याही मराठ्यांच्या राजवटीचा यात बारकाईने संदर्भ येतो. पुस्तक कोण लिहितो या दृष्टिकोनातून पाहिले तर शिवाजी महाराजांची कारकिर्द ,देखील तशीच सेक्यूलर विचाराची असल्याचे लक्षात येते. सर्व शाह्या कोसळताना कुठे बंड झाले नाही पण संभाजी महाराजांच्या हत्येनंतर मराठे पेट्रून उठले आणि १९ वर्षे मुघलांना पुरुन उरले. यातून शिवाजी महाराजांनी लोकांच्या मनावर राज्य केल्याचे दिसून येते. त्यांनी केवळ भूमीच नाही तर मनेही स्वतंत्र केली. आजच्या घडीला शिवाजी महाराज समजून घेताना मनेही तितकीच स्वच्छ असली पाहिजेत. कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सहज सुलभ भाषेतील हा एक संदर्भ ग्रंथ झाला असून शिक्षक, प्राध्यापक, अभ्यासक यांना कायमच मार्गदर्शक ठरेल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्राचार्य टी.एस.पाटील यांनी शिवाजी महाराजांचे इतिहासाला धरून असणारे चरित्र लिहिण्याची गरज या ग्रंथामुळे पूर्णत्वास गेल्याचे सांगितले. डॉ. पठाण यांनी पुस्तक लेखनामागची भूमिका विशद केली. यावेळी एम.बी.शेख, माजी आमदार श्रीपतराव शिंदे, बाळासाहेब कुपेकर, शिवाजीराव चव्हाण, प्राचार्य विलास पोवार उपस्थित होते.

26 DEC 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

डॉ. जयसिंगराव पवार : डॉ. आय. एच. पठाण लिखित छत्रपती शिवाजी महाराज ग्रंथ प्रकाशन

# छत्रपती शिवाजी महाराज हे हिंदूचे नव्हे, तर भूमिपुत्रांचे राजे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** हिंदूचा राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना संकुचित करणे चुकीचे आहे. ते केवळ हिंदूचे नव्हे तर भूमिपुत्रांचे राजे होते, त्यांच्यामुळेच देशात पहिल्यांदाच भूमिपुत्राचे अर्थात हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. जे पूर्णता सेक्युलर होते आणि पुढे कायमच लोकशाही देशाला प्रेरणास्थान राहिले, अशी मांडणी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी शनिवारी येथे केली.



डॉ. आय.एच.पठाण लिखित छत्रपती शिवाजी महाराज या ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी शाहू स्मारकमध्ये डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते व कुलगुरु डॉ.टी.शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी बाळासाहेब कुपेकर, शिवाजीराव चव्हाण, श्रीपतराव शिंदे, प्राचार्य टी.एस पाटील, प्राचार्य विलास पोवार, एम.बी.शेख उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीतर्फे प्राचार्य डॉ. आय.एच.पठाण लिखित छत्रपती शिवाजी महाराज या ग्रंथाचे प्रकाशन शाहूस्मारक भवनमध्ये झाले. यावेळी डॉ. पवार बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले, हे पुस्तक केवळ चरित्र नव्हे तर संदर्भ ग्रंथ आहे. शिवाजी महाराजांच्या पूर्वीची आणि नंतरच्याही मराठ्यांच्या राजवटीचा यात बारकाईने संदर्भ येतो. पुस्तक कोण लिहितो या दृष्टिकोनातून पाहिले तर शिवाजी महाराजांची कारकिर्द देखील तशीच सेक्यूलर विचाराची असल्याचे लक्षात येते. सर्व शाह्या कोसळताना कुठे बंड झाले नाही पण संभाजी महाराजांच्या हत्येनंतर मराठे पेटून उठले आणि १९ वर्षे मुघलांना पुरुन उरले. यातून शिवाजी महाराजांनी लोकांच्या मनावर राज्य केल्याचे दिसून येते. त्यांनी केवळ भूमीच नाही तर मनेही स्वतंत्र केली. आजच्या घडीला शिवाजी महाराज समजून घेताना मनेही तितकीच स्वच्छ असली पाहिजेत. कुलगुरु डॉ. शिर्के यांनी सहज सुलभ भाषेतील हा एक संदर्भ ग्रंथ झाला असून शिक्षक, प्राध्यापक, अभ्यासक यांना कायमच मार्गदर्शक ठरेल अशी अपेक्षा व्यक्त केली. प्राचार्य टी.एस.पाटील यांनी शिवाजी महाराजांचे इतिहासाला धरून असणारे चरित्र लिहिण्याची गरज या ग्रंथामुळे पूर्णत्वास गेल्याचे सांगितले. डॉ. पठाण यांनी पुस्तक लेखनामागची भूमिका विशद केली. यावेळी एम.बी.शेख, माजी आमदार श्रीपतराव शिंदे, बाळासाहेब कुपेकर, शिवाजीराव चव्हाण, प्राचार्य विलास पोवार उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव उद्यापासून

लोकमत न्यूज नेटवर्क

गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सवाचे यजमानपद महागाव येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाला मिळाले असून, उद्या, सोमवार, मंगळवार आणि बुधवारी महोत्सवाचे आयोजन केल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत व संयोजन समितीचे सचिव व्ही. एम. पाटील यांनी दिली.

उद्या, सोमवारी सकाळी १० वाजता संस्थाध्यक्ष ॲड. आण्णासाहेब चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. 'गोकुळ'चे संचालक शशिकांत पाटील-चुयेकर व गटविकास अधिकारी शरद मगर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. बुधवारी (दि. २९) समारोप समारंभासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, 'गोकुळ'चे संचालक अजित नरके, अभिनेता राहुल मगदूम उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवात ३२ कलाप्रकारांचा समावेश आहे. यामध्ये सांघिक व वैयक्तिक प्रकारांत लोकनृत्य, लोककला, एकांकिका, पथनाट्य स्पर्धा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
26 DEC 2021 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विवेकानंद, न्यू कॉलेज युवा महोत्सवात भारी

## मध्यवर्तीसाठी निवड : जिल्हास्तरीयचा निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे शुक्रवारी झालेल्या जिल्हा युवामहोत्सवात सर्वसाधारण विजेतेपद विवेकानंद महाविद्यालयाला व उपविजेतेपद न्यू कॉलेजला मिळाले. या दोनही महाविद्यालयांची उद्या, सोमवारी दि.२७ महागाव (ता. गडहिंग्लज) येथे सुरु होणाऱ्या मध्यवर्ती युवामहोत्सवासाठी निवड झाली आहे.

हा महोत्सव शुक्रवारी न्यू कॉलेजमध्ये झाला. ५६ महाविद्यालयांमधून सुमारे एक हजार विद्यार्थी सहभागी झाले होते. विवेकानंद महाविद्यालयाने सर्वाधिक १० कलाप्रकारात यश मिळवून विजेतेपद पटकावले. न्यू कॉलेजने ७ पारितोषिके मिळवून उपविजेतेपद मिळवले. या दोन्ही महाविद्यालयांची महागावमधील मध्यवर्ती युवामहोत्सवासाठी निवड झाली आहे. या मध्यवर्ती युवामहोत्सवात कोल्हापूर, सांगली, सातारा येथील जिल्हास्तरीय युवामहोत्सवात यश मिळविलेल्या महाविद्यालयांकडून सादरीकरण करण्यात येणार आहे.

### कलाप्रकार व विजेते महाविद्यालय पुढीलप्रमाणे

(अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय)

**लोककला :** न्यू कॉलेज, श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी. आर्ट्स, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय मुरगूड.

**लोकनृत्य :** सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड, आजरा महाविद्यालय, विवेकानंद महाविद्यालय.

**मूकनाट्य :** दत्ताजीराव कदम महाविद्यालय इचलकरंजी, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद महाविद्यालय.

**नकला :** दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद महाविद्यालय, राजाराम महाविद्यालय.

**मराठी वक्तृत्व :** दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कर्मवीर हिरे एज्युकेशन कॉलेज गारगोटी, न्यू कॉलेज.

**हिंदी वक्तृत्व :** न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज, डी. आर. माने महाविद्यालय कागल.

**इंग्रजी वक्तृत्व :** दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, महावीर कॉलेज, राजाराम कॉलेज.

**वादविवाद :** दूधसाखर महाविद्यालय बिद्री, न्यू कॉलेज, दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

**सुगम गायन :** विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

**लोकसंगीत वाद्यवृंद :** विवेकानंद कॉलेज, दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.

**लघुनाटिका :** श्री शिव शाहू महाविद्यालय सरुड, दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज.

**एकांकिका :** दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज, श्री शिव शाहू महाविद्यालय सरुड.

**समूहगीत :** विवेकानंद कॉलेज, दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, न्यू कॉलेज.

**पथनाट्य :** न्यू कॉलेज, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज.

पुढारी



कोल्हापूर : 'छत्रपती शिवाजी महाराज' ग्रंथ प्रकाशनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, डॉ. विलास पोवार, डॉ. एम. बी. शेख, शिवाजीराव चव्हाण. (छाया : नाज ट्रेनर)

# 'छत्रपती शिवाजी महाराज' ग्रंथ मार्गदर्शक : कुलगुरू

**कोल्हापूर :** प्राचार्य डॉ. ईस्माईल पठाण लिखीत 'छत्रपती शिवाजी महाराज' हा ग्रंथ इतिहासाचे शिक्षक, नवीन संशोधकांनी शिवचरित्र म्हणून वाचला पाहिजे. तो मार्गदर्शक असाच ग्रंथ आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूरच्या वतीने प्राचार्य डॉ. पठाण लिखीत 'छत्रपती शिवाजी महाराज' लिखीत ग्रंथ प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते. डॉ. पवार म्हणाले, डॉ. पठाण यांनी शिवाजी महाराज यांना इतिहास लिहिणे यास सामाजिक दृष्टिकोन आहे. देश एक राहण्यासाठी या गोष्टींची आज गरज आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांनी केले. यावेळी डॉ. विलास पोवार, उद्योगपती डॉ. एम. बी. शेख, शिवाजीराव चव्हाण, बाळासाहेब कुपेकर आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी



# 'शिवरायांचे स्त्रीदाक्षिण्य विवेकी, वास्तववादी'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा स्त्रियांविषयीचा दृष्टिकोन हा अत्यंत विवेकी आणि वास्तववादी स्वरूपाचा होता, असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ. मंजूश्री पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन लिखित 'छत्रपती शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि इस्लामपूरचे नाग-नालंदा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा समारंभ आयोजित करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, छत्रपतींच्या जीवनकार्याचे, कर्तृत्वाचे अद्याप असे अनेक पैलू आहेत, ज्यांच्यावर आपल्याला अद्याप प्रकाश टाकावयाचा आहे. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले, तर श्यामसुंदर मिरजकर यांनी आभार मानले. यावेळी वसंतराव मुळीक, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, विलास सोयम, डॉ. के. आर. मारुलकर, प्रा. शोभा शेटे, अविनाश भाले उपस्थित होते.

2 6 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारांनी युवा महोत्सवात रंगत!

## विजेत्यांची अंतिम फेरीसाठी निवड : ५६ महाविद्यालयांतील ९४६ विद्यार्थ्यांचा सहभाग



युवा महोत्सवात कलाविष्कार सादर करताना विद्यार्थी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ४१ वा युवा महोत्सव न्यू कॉलेजमध्ये उत्साहात झाला. स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्यां स्पर्धाकांची निवड गडहिंग्लज तालुक्यातील महागाव येथे दि. २७, २८ डिसेंबर रोजी होणाऱ्या अंतिम फेरीसाठी झाली आहे. जिल्ह्यातील ५६ महाविद्यालयांतून ९४६ विद्यार्थ्यांनी या महोत्सवामध्ये सहभाग घेतला आहे. विविध १४ प्रकारच्या सांघिक व वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या.

कोरोनामुळे गतवर्षी युवा महोत्सव ऑनलाईन घेतला होता; मात्र यंदा नियम पाळून, परवानगी घेऊनच युवा महोत्सव घेण्यात आला. यामध्ये लोककला, एकांकिका, लघुनाटिका, मूकनाट्य, पथनाट्य, भारतीय समूहगीत, लोकसंगीत वाद्यवृंद, वादविवाद, प्रश्नमंजूषा, नकला, सुगम गायन, मराठी, इंग्रजी व हिंदीतून वक्तृत्व अशा स्पर्धा घेण्यात आल्या.

**स्पर्धेतील विजेते अनुक्रमे असे :** सुगम गायन : विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ. लोकसंगीत वाद्यवृंद : विवेकानंद कॉलेज, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ. लघुनाटिका : श्री शिव शाहू महाविद्यालय सरूड, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज. एकांकिका : दत्ताजीराव कदम आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज, श्री शिव शाहू महाविद्यालय सरूड. समूहगीत : विवेकानंद कॉलेज, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, न्यू कॉलेज.

**पथनाट्य :** न्यू कॉलेज, दत्ताजीराव कदम आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज. लोककला : न्यू कॉलेज कोल्हापूर, आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय कोवाड. लोकनृत्य : सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, आजरा महाविद्यालय, आजरा, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. मूकनाट्य : दत्ताजीराव कदम आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज इचलकरंजी. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स. विवेकानंद कॉलेज. नकला : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज, राजाराम कॉलेज. मराठी वक्तृत्व : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, कर्मवीर हिरे आर्टस्, सायन्स, कॉमर्स अँड एज्युकेशन कॉलेज गारगोटी, न्यू कॉलेज, कोल्हापूर. हिंदी वक्तृत्व : न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज, डी. आर. माने महाविद्यालय कागल.

**इंग्रजी वक्तृत्व :** प्रथम देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, महावीर महाविद्यालय, राजाराम कॉलेज. वादविवाद : दूधसाखर महाविद्यालय बिद्री, न्यू कॉलेज, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर.

26 DEC 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तलवारबाजी स्पर्धेत शिवराज महाविद्यालयाला चॅम्पियनशिप

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठामार्फत आयोजित शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय तलवारबाजी स्पर्धेत शिवराज महाविद्यालयाने सांघिक जनरल चॅम्पियनशिप पटकावली. शिवराजचे विपुल येडकर, प्रथमकुमार शिंदे, मुलींमध्ये आजरा महाविद्यालयाची ज्योती सुतार यांनी वैयक्तिक चॅम्पियनशिप पटकावली. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.

स्पर्धेचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष वसंतराव यमगेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुनील शिंत्रे, पी. टी. गायकवाड, नागेश चौगुले, युवराज बरगे, सचिव प्रा. डॉ. अनिल कुराडे, दिग्विजय कुराडे, प्राचार्य एस. एम. कदम, विनय जाधव आदी उपस्थित होते.



गडहिंग्लज : तलवारबाजी स्पर्धेतील विजयी खेळाडूंना पारितोषिक वितरणप्रसंगी प्रा. अनिल कुराडे, प्राचार्य एस. एम. कदम यांच्यासह मान्यवर.

स्पर्धेत फॉईल क्रीडा प्रकार- विपुल येडकर (गडहिंग्लज), गिरीश जकाते (सांगली), धनंजय यादव व प्रथमकुमार शिंदे (गडहिंग्लज), ईपी क्रीडा प्रकार- रवींद्र शिंदे (गडहिंग्लज), गिरीश जकाते (सांगली), प्रणव रावळ (इचलकरंजी) व धनंजय यादव (गडहिंग्लज), सेबर क्रीडा प्रकार- धनंजय जाधव, आदित्य अनगळ (गडहिंग्लज), प्रतीक जाधव (कोल्हापूर) व विपुल येडकर (गडहिंग्लज), मुली फॉईल- ज्योती सुतार (आजरा), अमृता तराळ (गडहिंग्लज), अनन्या जोशी व ऋतुजा पाटील (कोल्हापूर), ईपी- संजना घोरपडे (कोल्हापूर), अनुजा धबाले (गडहिंग्लज), क्रांती बेनाडे व अनन्या जोशी (विवेकानंद), सेबर-ज्योती सुतार (आजरा), सानिका मोरे, स्नेहल पाटील व स्नेहल कुंभार (कोल्हापूर).

संदीप जाधव, संभाजी मिरजे, अजित पाटील, राहुल सरडे, प्रफुल्ल जगताप यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे सचिव विनय जाधव, शुभम जाधव, प्रफुल्ल धुमाळ, राहुल मगदूम, धनंजय पाटील, पृथ्वीराज सरनाईक यांच्यासह खेळाडू व क्रीडा शिक्षक उपस्थित होते. निवड झालेल्या खेळाडूंच्या स्पर्धा अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा अमृतसर (पंजाब) येथे होणार आहे.

2 6 DEC 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'छत्रपती शिवाजी महाराज' ग्रंथ दिशादर्शक

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; डॉ. इस्माईल पठाण लिखित ग्रंथाचे प्रकाशन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराज या ग्रंथाचे लिखाण केले आहे. त्यामुळे हा ग्रंथ संशोधक आणि शिक्षक या दोघांना उपयुक्त आहे. शिवचरित्र म्हणून हा ग्रंथ अभ्यासल्यास तो दिशादर्शक ठरेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. त्यांच्या हस्ते या ग्रंथाचे आज शाहू स्मारक येथे प्रकाशन झाले. महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीने



कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज या ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी झाले. यावेळी बाळासाहेब कुपेकर, श्रीपतराव शिंदे, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. इस्माईल पठाण, प्रा.टी.एस.पाटील, विलास पोवार, डॉ.एम.एस.शेख आदी.

ग्रंथ प्रकाशित केला आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. पठाण यांनी ग्रंथ लिहिताना आलेले अनुभव आणि ग्रंथाची मांडणी याविषयी माहिती सांगितली. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ''ऐतिहासिक संदर्भ व पुरावे देऊन हा ग्रंथ लिहिला गेला आहे. त्यामुळे शिक्षक आणि अभ्यासक यांना तो मार्गदर्शक आहे. मात्र सर्वसामान्य माणसांनी शिवचरित्र म्हणून या ग्रंथाचे अध्ययन केले तर तो दिशादर्शक ठरेल.''

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, ''महाराष्ट्रातील इतिहासकारांनी शिवाजी महाराज यांचे लेखनातून कौतुक केले आहे; परंतु डॉ. पठाण यांनी शिवाजी महाराज यांचा इतिहास लिहिणे यास सामाजिक दृष्टिकोन आहे. देश एक राहण्यासाठी या गोष्टींची आज गरज आहे.''

बाळासाहेब कुपेकर, डॉ. विलास पोवार, उद्योगपती डॉ. एम. बी. शेख, शिवाजीराव चव्हाण आदी उपस्थित होते. प्राचार्य टी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले.

सकाळ

# दूरशिक्षण केंद्राच्या संचालकपदी डॉ. मोरे

सकाळ वृत्तसेवा



दिनकर मोरे

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राच्या संचालकपदी प्रा. डॉ. दिनकर खाशाबा मोरे यांची निवड करण्यात आली. मोरे यांना अध्यापनाबरोबरच महाविद्यालयाच्या प्रशासनाचाही अनुभव असून त्यांनी अधिसभा सदस्य म्हणूनही काम केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राला पूर्णवेळ संचालक नसल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने नवीन प्रवेश घेण्यास मनाई केली होती. या पार्श्वभूमीवर तातडीने विद्यापीठाने संचालकपदी डॉ. मोरे यांची नेमणूक केली.

डॉ. मोरे यांनी के.आर.पी.कन्या महाविद्यालय इस्लामपूर येथे ३५ वर्षे अध्यापन केले आहे. ५ वर्षे ते अधिसभा सदस्यही होते. अकॅडमीक कौन्सिलवरही त्यांनी १० वर्षे काम केले आहे. बोर्ड ऑफ स्टडीजचे चेअरमन म्हणून त्यांनी १० वर्षे काम पाहिले आहे. त्यांना २० वर्षांचा प्रशासकीय अनुभ्वही आहे. सोमवारी ते संचालकपदाचा पदभार स्वीकारतील.

सकाळ

» जिल्हास्तरीय युवा महोत्सव

# 'विवेकानंद', 'कॉमर्स', 'न्यू कॉलेज'ची बाजी

## विजेत्यांना 'मध्यवर्ती' महोत्सवात संधी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विवेकानंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नऊ विविध स्पर्धांत क्रमांक मिळवले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी ८ आणि न्यू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी ७ विविध कलाप्रकारांत क्रमांक पटकावले. जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील सर्व विजेत्यांना मध्यवर्ती महोत्सवात सहभागी होता येणार आहे. हा महोत्सव सोमवार (ता.२७) ते बुधवार (ता. २९) या कालावधीत महागाव (ता. गडहिंग्लज) येथील संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये होणार आहे.



शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव शुक्रवारी (ता. २४) न्यू कॉलेजमध्ये झाला. यात विविध कलाप्रकारांत विवेकानंद महाविद्यालय, न्यू कॉलेज आणि कॉमर्स कॉलेजने बाजी मारली. अन्य महाविद्यालयांनीही चांगली कामगिरी केली. निकाल पुढीलप्रमाणे अनुक्रमे :

- **लोककला** : न्यू कॉलेज, कन्या महाविद्यालय इचलकरंजी, आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय मुरगूड.
- **लोकनृत्य** : मंडलिक महाविद्यालय मूरगूड, आजरा महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज.
- **मूकनाट्य** : दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज.
- **नकला** : कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज, राजाराम कॉलेज.
- **मराठी वक्तृत्व** : कॉलेज ऑफ कॉमर्स, कर्मवीर हिरे कॉलेज गारगोटी, न्यू कॉलेज.
- **हिंदी वक्तृत्व** : न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज, माने महाविद्यालय कागल.
- **इंग्रजी वक्तृत्व** : कॉलेज ऑफ कॉमर्स, महावीर महाविद्यालय, राजाराम महाविद्यालय.
- **वादविवाद** : दूधसागर महाविद्यालय बिद्री, न्यू कॉलेज, कॉलेज ऑफ कॉमर्स.
- **सुगम गायन** : विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.
- **लोकसंगीत वाद्यवृंद** : विवेकानंद महाविद्यालय, कॉलेज ऑफ कॉमर्स, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ.
- **लघुनाटिका** : शिव शाहू महाविद्यालय सरुड, कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज.
- **एकांकिका** : दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज, शिव शाहू महाविद्यालय सरूड.
- **समूहगीत** : विवेकानंद कॉलेज, कॉलेज ऑफ कॉमर्स, न्यू कॉलेज.
- **पथनाट्य** : न्यू कॉलेज, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज.

26 DEC 2021 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवाजी महाराज भूमिपुत्रांचे राजे

## ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे प्रतिपादन : 'छत्रपती शिवाजी महाराज' ग्रंथाचे प्रकाशन



कोल्हापूर : डॉ. इस्माईल पठाण लिखित 'छत्रपती शिवाजी महाराज' ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार. सोबत बाळासाहेब कुपेकर, ॲड. शिवाजीराव चव्हाण, माजी आमदार ॲड. श्रीपतराव शिंदे, डॉ. टी. एस. पाटील, डॉ. इस्माईल पठाण, डॉ. विलास पोवार, एम. बी. शेख.

प्रतिनिधी
कोल्हापूर

अलीकडच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज यांना संकुचित करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. शिवराय केवळ हिंदूंचे राजे नव्हते तर ते भूमिपुत्रांचे, रयतेचे राजे होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले.

महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीने प्रकाशित केलेल्या डॉ. इस्माईल पठाण लिखित 'छत्रपती शिवाजी महाराज ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी येथील राजर्षी शाहू स्मारक भवनमध्ये झाले. यावेळी अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. पवार यांनी मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, पठाण यांच्या ग्रंथात केवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचाच इतिहास नाही तर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि रणरागिणी करवीर संस्थापिका छत्रपती ताराराणी यांच्याही शौर्य, कार्य आणि कर्तृत्वाचा आढावा घेतला आहे. काही दिवसांपासून छत्रपती शिवाजी महाराजांना संकुचित करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. पण छत्रपती शिवराय हिंदूंचे राजे नव्हते तर तमाम रयतेचे, भूमिपुत्रांचे राजे होते. म्हणून शिवकाळातील मावळे त्यांच्यासाठी प्राणपणाने लढत होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य जात, धर्म, पंथ या पलीकडचे होते. उद्योजक एम. बी. शेख, प्राचार्य टी. एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. इस्माईल पठाण यांनी ग्रंथाविषयी माहिती दिली.

### संशोधकांसाठी संदर्भग्रंथ

पठाण यांनी ग्रंथात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्थापत्य, शेती, लष्करी प्रशासन यासंदर्भात संदर्भ देत कुशलतेने लिखाण केले आहे. संशोधकांसाठी संदर्भग्रंथ म्हणून पठाण यांचा ग्रंथ उपयुक्त ठरणार आहे, असे कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले.

तरुण भारत

# डॉ. दिनकर मोरे दूर शिक्षणच्या संचालकपदी



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या संचालकपदी डॉ. दिनकर मोरे यांची निवड झाली आहे. मोरे यांना अध्यापनाबरोबरच महाविद्यालयाच्या प्रशासनाचाही अनुभव असून त्यांनी अधिसभा सदस्य म्हणूनही काम पाहिले आहे. सोमवारी ते संचालकपदाचा पदभार स्विकारणार आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राला पूर्णवेळ संचालक नसल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाने पदवी व पदव्युत्तर प्रथम वर्षाला नवीन प्रवेश देण्यास मनाई केली होती. या पार्श्वभूमीवर तातडीने विद्यापीठाने संचालकपदासाठी जाहिरात देऊन अर्ज मागवले होते. सहा उमेदवारांनी अर्ज भरले होते. मुलाखतीनंतर डॉ. मोरे यांची दूर शिक्षणच्या संचालकपदी नेमणूक केली.. डॉ. मोरे यांनी केआरपी कन्या महाविद्यालय इस्लामपूर येथे ३५ वर्षे अध्यापन केले आहे. ५ वर्षे ते अधिसभा सदस्यही होते. बोर्ड ऑफ स्टडीजचे चेअरमन म्हणून त्यांनी १० वर्षे काम पाहिले आहे. त्यांना २० वर्षे प्रशासकीय अनुभवही आहे. त्यांच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कार्याचा फायदा दूरशिक्षण केंद्राला होणार आहे.